**<u>ठळक बातम्या</u>**

- नवीन फौजदारी कायद्यांमुळे वसाहतवादाच्या मानसिक गुलामगिरीतून भारतीयांना मुक्ती मिळाल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन
- दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठीचे राष्ट्रीय पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान /राज्यातले प्रियांका दाभाडे, कनिका अग्रवाल, प्रथमेश सिन्हा, आणि सेंट झेवियर्स महाविद्यालय पुरस्कारनं सन्मानित
- दिव्यांगजनाच्या समावेशनासाठी सुरु केलेल्या सुगम्य भारत अभियानाला ९ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त देशभरात विविध कार्यक्रम
- अदानी उद्योग समूहाचं कथित लाचखोरी प्रकरण, संभल हिंसाचार आणि इतर मुद्यांवरून निदर्शनं करत संसदेत विरोधी पक्ष सदस्यांचा सभात्याग

**आणि**

- येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता

**<><><><><>**

नवीन फौजदारी कायद्यांमुळे ब्रिटीश कायद्यांमधून वसाहतवादाच्या मानसिक गुलामगिरीतून भारतीयांनी मुक्ती मिळाल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीचं लोकार्पण केल्यानंतर आज हरियाणात चंडीगढ इथं ते बोलत होते. काम त्यांची संहिता तयार करण्याइतकंच अवघड आणि अभ्यासपूर्ण होतं असं ते म्हणाले. या कायद्यांच्या यशस्वी अंमलबजावणी निमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नागरिकांचं अभिनंदन केलं. या कार्यात योगदान देणाऱ्या सर्व व्यक्ति आणि संस्थांचे त्यांनी आभार मानले हे तीन कायदे देशाच्या न्यायव्यवस्थेच्या इतिहासातला मैलाचा दगड ठरतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यापूर्वी नव्या फौजदारी कायद्यांच्या यशस्वी

अंमलबजावणीतील प्रगतीबद्दलचं सादरीकरण त्यांनी पाहिलं. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा त्यांच्यासोबत होते. भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष्य अधिनियम या तीन नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीला यावर्षी १ जुलैपासून सुरूवात करण्यात आली.

**<><><><><>**

दिव्यांग जनांचा सार्वजनिक वावर सोयीचा व्हावा तसंच, त्यांना समान वागणूक दिली जावी हे सर्वांचं कर्तव्य आहे, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. आंतरराष्ट्रीय दिव्यांगजन दिनानिमित्त नवी दिल्ली इथं आयोजित दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठीचे राष्ट्रीय पुरस्कार प्रदान केल्यानंतर त्या बोलत होत्या. दिव्यांगांना कोणत्याही अडथळ्याशिवाय जगता येणं हा समाजासाठी प्राधान्यक्रम असायला हवा. ज्या समाजात दिव्यांगाना समान संधी आणि वागणूक मिळेल तोच समाज प्रगत समाज असतो. याच उद्दिष्टानं सुगम्य भारत या अभियानाची वाटचाल सुरू आहे, असं राष्ट्रपती यावेळी म्हणाल्या....

**होल्ड - बाईट - राष्ट्रपती**

आंतरराष्ट्रीय दिव्यांग व्यक्ती दिनानिमित्त आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी एकूण २२ व्यक्ती आणि ११ संस्थांना राष्ट्रीय पुरस्कार देण्यात आले. या पुरस्कार विजेत्यांमध्ये महाराष्ट्रातल्या प्रियांका दाभाडे, कनिका अग्रवाल, प्रथमेश सिन्हा या तिघांचा तसंच सेंट झेवियर्स महाविद्यालयाचा समावेश आहे.

**<><><><><>**

दिव्यांग व्यक्तींसाठी सर्वसमावेशक वातावरण असलेला भारत निर्माण करण्याच्या उद्देशानं सुरू झालेल्या सुगम्य भारत अभियानाचा आज नववा वर्धापन दिन आहे. पायाभूत सुविधा, वाहतुकीच्या सोयी आणि सार्वजनिक जागांचा वापर दिव्यांगांना अधिक चांगल्या प्रकारे करता यावा यासाठी हे अभियान सुरू करण्यात

आलं. तसंच दिव्यांगांचे हक्क आणि त्यांच्या गरजांविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठीही हे अभियान सुरू करण्यात आलं. गेल्या ९ वर्षांत या अभियानानं आपल्या उद्दिष्टाचे अनेक महत्त्वपूर्ण टप्पे गाठले आहेत. सरकारी इमारती तसंच वाहतूक सुविधांची पुनर्रचना करण्यापासून ते सांकेतिक भाषा प्रशिक्षण कार्यक्रम, विमानतळावरचे रॅम्प, शौचालयांची पुनर्रचना, रेल्वे आणि बस स्थानकांमध्ये दिव्यांगासाठी विशेष रॅम्प अशा सोयींचा त्यात समावेश आहे.

सुगम्य अभियानाच्या नवव्या वर्धापन दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज दिव्यांग जनांसाठी सुलभता, समानता आणि संधींविषयी सरकारच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. पॅरालिंपिक स्पर्धेत भारताच्या दिव्यांग खेळाडूंनी केलेल्या कामगिरीचा संपूर्ण देशाला अभिमान वाटला, असं त्यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

सुगम्य भारत अभियानाला ९ वर्षं पूर्ण होत असल्याच्या निमित्तानं, मुंबईच्या अलीयावर जंग राष्ट्रीय वाचा आणि श्रवण दिव्यांगजन संस्थेच्या ऑडिऑलॉजिस्ट आणि स्पीच लँग्वेज पॅथॉलॉजिस्ट गौरी तेलंग यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं,

**होल्ड--बाइट--(गौरी तेलंग).**

**<><><><><>**

जागतिक दिव्यांग व्यक्ती दिनाच्या निमित्तानं आज राज्यात विविध उपक्रम राबवण्यात आले.

**सोलापूर** जिल्ह्यातल्या पात्र दिव्यांग व्यक्तींचा शोध घेऊन त्यांना दिव्यांग प्रमाणपत्र घरपोच देण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीनं मिशन अस्मिता हे अभियान सुरु करण्यात आलं आहे. या अभियानातून जवळपास १५ हजार १५८ दिव्यांग व्यक्तीची प्राथमिक तपासणी करण्यात आली असून त्यापैकी १२ हजार ६६६ दिव्यांग प्रमाणपत्रासाठी पात्र ठरले आहेत. त्यांना लवकरच हे प्रमाणपत्र घरपोच देण्यात येणार आहेत.

**सांगली** जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाच्या वतीनं देखील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचं आणि त्यांनी बनवलेल्या आकर्षक वस्तूंच्या प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं. या कार्यक्रमात जिल्ह्यातल्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या ३६ शाळांनी भाग घेतला.

**सातारा** जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागानं देखील दिव्यांगांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्याचं आवाहन केलं. ४० टक्के किंवा त्याहून अधिक दिव्यांगत्त्व असणाऱ्या व्यक्तींसोबत दिव्यांगत्व नसलेल्या व्यक्तीच्या विवाहास प्रोत्साहन म्हणून शासनाकडून अर्थसहाय्य दिलं जातं , त्या योजनेचा

लाभ दिव्यांग व्यक्तींनी घ्यावा , तसंच इयत्ता १ ली ते १० पर्यंतच्या वर्गात शिक्षण घेणा-या दिव्यांग विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घ्यावा असं आवाहन केलं.

**परभणी** शहरात आज जागतिक दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांग संघटना, दिव्यांग शाळा, कर्म शाळा यांच्या वतीनं रॅली काढण्यात आली. दिव्यांग संघटना, दिव्यांग शाळेतील विद्यार्थी,समाज कल्याण विभागाचे अधिकारी,आरोग्य अधिकारी या रॅलीसाठी उपस्थित होते.

**नांदेड**मध्ये आज बेरोजगार दिव्यांग कल्याण कृती संघर्ष समितीच्या वतीनं जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात आला. विविध प्रलंबित प्रश्नांसंदर्भात हा मोर्चा काढण्यात आला होता.

**<><><><>**

अदानी उद्योग समूहाचं कथित लाचखोरी प्रकरण, संभल हिंसाचार आणि इतर मुद्यांवरून निदर्शनं करत लोकसभेत विरोधी पक्षांच्या सदस्यांनी आज सभात्याग केला. सभागृहाचं कामकाज सुरू झाल्यानंतर विरोधी पक्षांच्या सदस्यांनी या मुद्यावर प्रश्न विचारायला सुरुवात केली. मात्र हे मुद्दे शून्य प्रहरात उपस्थित करावेत, असं लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी त्यांना सांगितलं. त्यामुळे काँग्रेस, समाजवादी पार्टी, द्रमुक आणि इतर पक्षाच्या खासदारांनी गदारोळ करत सभात्याग केला.

शून्य प्रहरात समाजवादी पार्टीचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी संभल हिंसाचार प्रकरणी प्रश्न उपस्थित केला. संभल हिंसाचार हा नियोजित कट होता असा आरोप यादव यांनी केला. या हिंसाचाराला जबाबदार असणाऱ्या पोलीस आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

राज्यसभेतही समाजवादी पार्टीचे खासदार रामगोपाल यादव यांनी संभल हिंसाचारप्रकरणी प्रश्न उपस्थित केला. त्यानंतर समाजवादी पार्टी आणि तृणमूल काँग्रेसच्या खासदारांनी सभात्याग केला.

<><><><><>

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय, तसंच केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्थेच्या सर्व शाखांना शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी काम करण्याचं आवाहन केलं आहे. केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्थेच्या शतकमहोत्सवी कार्यक्रमात ते बोलत होते. या संस्थेच्या शतकमहोत्सवी स्तंभाचं उद्घाटन, तसंच संस्थेनं विकसित केलेली दोन नवी तंत्रज्ञानं आणि संस्थेच्या कामाशी संबंधित तीन पुस्तकांचं प्रकाशनही उपराष्ट्रपतींच्या हस्ते झालं. केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान, या खात्याचे राज्यमंत्री रामनाथ ठाकुर, महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, संस्थेचे पदाधिकारी आणि इतर यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

फेंजल चक्रीवादळाचा परिणाम महाराष्ट्रातल्या वातावरणावरही दिसून येत आहे. पुढच्या ४८ तासात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. कोकणात किनारपट्टी भागात सोसाट्याचे वारे वाहतील आणि मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. विदर्भात मात्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता आहे.